| MHAH060004272025 | फौजदारी चौकशी अर्ज १२४/२०२५<br>अश्वीनी शांतवन अमोलिक वि. शांतवन हरी अमोलीक |
|---|---|

## निशाणी १९ खालील आदेश पारीत

प्रस्तुत प्रकरण भारतीय नागरीक सुरक्षा संहिता १४४ प्रमाणे पोटगी मिळणे करिता दाखल करण्यात आलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता सामनेवाले हजर झालेला आहे. प्रकरण सामनेवाला यांचे म्हणणे येणेवर प्रलंबीत आहे. सामनेवाला यांना हजर होवून जवळ जवळ ११ महिने झालेले आहेत. दिनांक २३.०१.२०२६ रोजी सामनेवाला यांनी म्हणणे देणे कामी मुदतीचा अर्ज दिलेला असुन त्यावर आदेश होवून ५००/- रुपये कॉस्ट करण्यात आलेली आहे. त्यानंतर सामनेवाला यांनी दिनांक २९.०१.२०२६ रोजी गैरहजर राहून म्हणणे देणेकामी मुदतीचा अर्ज दिला आहे. सदर अर्जावर अर्जदाराचे म्हणणे येणे बाकी आहे.

२. आजरोजी सामनेवाला यांनी निशाणी १९ नुसार सामनेवाला यांनी गैरहजर माफीचा अर्ज देवून म्हणणे देणे कामी मुदत मागितलेली आहे.

३. अर्जदाराचे विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जाला तोंडी प्रखर आक्षेप दर्शविलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, सामनेवाला यांना अंतरीम अर्जावर म्हणणे दाखल करण्यासाठी जवळ जवळ ५ महीन्यांचा अवधी देण्यात आलेला आहे. परंतु सामनेवाला यांनी अदयापही म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सामनेवाला वेळ काढुपणा काढत आहे असे लक्षात येत आहे. सामनेवाला यांनी अजुन मागील मुदतीच्या अर्जावरील कॉस्ट भरलेली नाही. तरीही नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता सामनेवाल्यास एक शेवटची संधी देण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश.

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२.	सामनेवाला यांनी अर्जदारास १०००/- अर्जाचा खर्च म्हणुन दयावा.

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2026.03.02 10:50:22 +0530

**(काटकर विजया एन.एस.)**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**

**दिनांक–२६.०२.२०२६** **न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.**